# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०६/२०१८

**१) सोन्या– चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक ०५/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अमर रामदास पांडे वय ४० वर्ष, रा. आराधना नगर खात रोड भंडारा याची सासुची प्रकृती खराब असल्याने परिवसरासह भोपाल (म. प्र) येथे गेले होते दिनांक १०/०६/२०१८ ला भंडारा येथे परत आले असता घराचे समोरील दाराचा ताला तुटलेला दिसल्याने फिर्यादीने आत जावुन पाहीले असता घरामधील आलमारीत ठेवलेला सोन्याचे टॉप्स ४ ग्रॅम, सोन्याचा मंगळसुत्र ३५ ग्रॅम, चांदीचे सामान व नगदी १५,००/–रु. असा एकुण ७३,५००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन वरील प्रमाणे माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,४५४,३८० भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मंदीरातील पितळी घंटयाची चोरी :–**

दिनांक १०/०६/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील सार्वजनीक ठिकानातील हनुमान मंदीरा मधील लावले असलेल्या अंदाजे ९ किलोच्या ३ पितळी घंटया किंमती ९,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात आरोपीने कोणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादी मुकेश प्रेमलाल लुटे वय २८ वर्ष, रा. टवेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक ०९/०६/२०१८ ते १०/०६/२०१८ चे २२.०० ते ०५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी भास्कर मारोती बागडे वय ४८ वर्ष, रा. गांधी चौक गोंडउमरी यांचे राहते घराचे मागील दाराचा कडी – कोंडा कोणीतरी अज्ञात आरोपीने वाकवुन आत प्रवेश करुन माज घरात ठेवलेल्या लाकडी आलमारीतुन २ सोन्याचे डोरले वजन २ ग्रॅम, ४ नग सोन्याचे मनी १ ग्रॅम, सोन्याचा पदक ३ ग्रॅम व ६ ग्रॅम, सोन्याचे मनी व नगदी ५०,०००/–रु. असा एकुण ६८,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०६/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही बोंडे शिवारातील नाल्याचे काठेवरील अरतफरीच्या झाडची भाजी तोडत असतांना यातील आरोपीने तिचा विनयभंग केला व कोणालाही सांगशील तर मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन काठीने डोक्यावर मारुन मिरची पावडर डोळयावर फेकुन रोख रक्कम असलेली बॅग हिसकावुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०९/०६/२०१८ चे २१.४५ ते २२.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा त्याचे साथीदार पंकज माढवगडे सोबत मोटार सायकलने अरुण ट्रेडर्स तामसवाडी रोड गोवर्धननगर तुमसर येथुन नगदी १,३०,०००/–रु. बॅग मध्ये भरुन घरी जात असतांना २ अनोळखी इसमांनी वय अंदाजे २६ ते २८ चे वयोगटातील यांनी संगनमत करुन जखमी व साथीदाराचे चेहऱ्यावर मिरची पावडर फेकुन तसेच काठीने जखमीचे डोक्यावर व उजवे हातवर मारहान करुन त्याचे जवळ असलेले १,३०,०००/–रु. रोख रक्कम असलेली बॅग हिसकावली व पळुन गेल्याने जखमीचे तोंडी बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३९४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) मोटार सायकल चालकाने टाटा व्हिस्टा गाडीला धडक देवुन गाडीचे नुकसान करुन स्वत: जखमी झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विजय भट्टु मराठे वय ४१ वर्ष, रा. नरभाड जि. धुळे हे परीवारासह टाटा व्हिस्टा गाडी क्र. एमएच ४९ बी– ९००७ ने तिरोडा येथुन आंधळगाव मार्गे नागपुर येथे मयतीला जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील होंडा साईन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन चिचोली येथे धडक मारुन व स्वत: जखमी होवुन फिर्यादीचे वाहनाचे नुकसान करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**७) तीक्ष्ण हत्याराने वार करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आरोपीला ओळखत असल्याने त्याला भेटण्याकरीता गेला होता फिर्यादी व आरोपी आपसात गप्पागोष्टी करीत असतांना अचानक आरोपी याने फिर्यादीचे डावे बाजुला गळयावर तीक्ष्ण हत्याराने वार करुन जखमी फिर्यादी नुपेश ताराचंद धांडे वय ३६ वर्ष, रा. गडेगाव ह.मु. पो. मु. गोदिंया यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) विद्युत करंट लागुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे १८.३० वाजता यातील मृतक खेमराज मोरेश्वर बिलवणे वय ६० वर्ष, रा. विरसी खंदार हा घराचे समोरील पोर्चचे बाजुला कोठया जवळ विद्युत करंट लागनु मरण पावल्याने फिर्यादी मोरेश्वर कळसुजी बिलवने वय ६० वर्ष, रा. विरली खंदार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिऱ्हेपुजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**९) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे ०२.०० वाजता यातील मृतक सौ. पुष्पा रामदास चव्हाण वय २७ वर्ष, रा. कोदामेंडी ही २ दिवसा पासुन आजारी होती तिचेवर स्थानीक डॉक्टरांकडुन उपचार करण्यास आले उपचारा दरम्यान मृतक ही दिनांक १०/०६/२०१८ चे रात्री ०२.०० वाजता दरम्यान मरण पावली तीचे चुलत भावाला पतीने फोन वरुन माहीती दिल्यावरुन त्यांनी कोडापुर जि. यवतमाळ येथुन प्रवास करुन पो.स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने फिर्यादी लहाणु धर्मा शिंदे वय ४६ वर्ष, रा. केडापुर जि. यवतमाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**१०) विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०९/०६/२०१८ चे १२.०० ते १०/०६/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील मृतक रुपेश जगन मानकर वय ३५ वर्ा, रा. पारडी हा दिनांक ०९/०६/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान शेतावर शेतीचे काम करण्यास गेला होता तो सायंकाळी परत न आल्याने त्याचा फियादीने गावात व शेतात शोध घेतला तो मिळुन आला नाही मृतक हा मंतीमंद असल्याने कुठे ही निघुन जात असे आज दिनांक १०/०६/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान फिर्यादीने स्वतःचे शेतात शोध घेतला असता शेतावरील विहीरीत मृतक हा मृतावस्थेत पडलेला दिसला अश्या फिर्यादी जगन उरकुडा मानकर वय ५८ वर्ष, रा. पारडी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**११) गळफास लावुन महिलेचा मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे १५.०० ते १६.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीची बहीन मृतक सौ. नुतन प्रविण रामटेके वय २८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा ही सासरी जात नाही असे बोलुन रागाने स्वतःहुन गळफास घेवुन मरण पावल्याने फिर्यादी बबलु पद्माकर बन्सोड वय ३७ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१२) विषारी औषधी प्राशन केल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे ०५.१० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. गिता मधुकर किटे वय ५० वर्ष, रा. कान्हळगाव हीने दिनांक १०/०६/२०१८ ला ओपी पॉयझींग झाल्याने तीला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बाभरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. दिक्षीत पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**१३) विदयुत करंट लागुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १०/०६/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रमोद भास्कर लांजेवार वय ३८ वर्ष, रा. मोहरी हा नेहमी प्रमाणे दात घासत –घासत घराचे स्लॅपवर गेला असता मृतकची पत्नी हिने पती आता पर्यत कुठे गेले दिसत नाही म्हणुन स्लॅपवर जावुन पाहीले असता पती प्रमोद हा स्लॅपवर पडुन दिसल्याने आरडा ओरड केले तेव्हा मोहल्यातील लोक जमा झाल्याने फियादीने जावुन पाहीले असता व मृतकास छपरीत आणुन ठेवुन स्लॅपवर जावुन पाहीले असता ईलेक्ट्रीक मोठी लाईन मृतकचे घरावरुन गेली असल्याने त्याचे विदयुत प्रवाहाने त्याचा मृत्यु झाला आहे. अश्या फिर्यादी भोजराव वारलुजी लांजेवार वय ५८ वर्ष, रा. मोहरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१४) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०६/२०१८ चे १७.५१ वाजता दरम्यान यातील आरोपी चालक त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूचे नशेत पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे चालवीतांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१५) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १०/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व तुमसर येथे हातभट्टी दारु अड्डयावर धाडी घालुन ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६२ लिटर हातभट्टी + मोटार सायकल किंमती ४६२००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १०/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १०९ केसेस करण्यात आले आहे.



**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.